कांदळवनाच्या (Mangroves) क्षेत्राच्या व्यवस्थापन व संवर्धनासाठी व मा. उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता आवश्यक असणा-या ३७ अधिकारी / कर्मचा-यांची पदे निर्माण करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१०/प्र.क्र.९२/फ-१.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०१ नोव्हेंबर, २०११.

वाचा :- १. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक : कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.५३/११०/११-१२, दिनांक २० ऑगस्ट, २०११.

२. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पृष्ठांकन क्रमांक : संयुक्त २०११/इतिवृत्त/२१४/११/ विसु-१, दिनांक ३०.०८.२०११

३. उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ३ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या ६७ व्या बैठकीचे कार्यवृत्त क्र.पदनि-२०११/प्र.क्र.२१०/११/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ०८/०९/२०११.

**शासन निर्णय :-**

रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ६/१०/२००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवरील कांदळवनांचे क्षेत्र "संरक्षित वने" म्हणून विविध अधिसूचनांद्वारे अधिसूचित करण्यात आले आहे.

२. उपरोक्त कांदळवनांच्या संरक्षण व संवर्धनासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग तसेच निधी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. मात्र यासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग क्षेत्रीय पातळीवर उपलब्ध नाही. त्या अनुषंगाने उपरोक्त कांदळवन क्षेत्राच्या व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी आवश्यक असलेल्या पदांची निर्मिती तसेच सदर पदे पुढे चालू ठेवणेस्तव या योजनेंतर्गत ३७ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन होता.

३. रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ६/१०/२००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील "संरक्षित वने" म्हणून अधिसूचित केलेल्या कांदळवनांचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी खालील तपशीलानुसार ३७ पदे

निर्मिती करण्यास व त्यांना पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. सदर पदे उपलब्ध अधिकारी / कर्मचारी यांच्यामधून खालील वेतनश्रेणीनुसार भरण्यात यावी. जर अधिकारी / कर्मचारी उपलब्ध नसतील तर सदर पदे सेवानिवृत्त वन अधिकारी / कर्मचारी किंवा बाह्य स्त्रोताद्वारे (Out Sourcing) भरण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत असून त्यांना नियमित वेतनश्रेणी न देता खालील तक्त्यातील स्तंभ (५) नुसार दरमहा एकत्रित रक्कम देण्यात यावी.

## पदांचा तपशील

| अ. क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी | वित्तलब्धी (प्रती महिना) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सहा.वनसंरक्षक | १ | रु.९३००-३४८०० + ग्रेड पे रु.५००० | रु.३०००० + इतर भत्त्यासाठी रु.५००० |
| २ | वनक्षेत्रपाल | ४ | रु.९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४४०० | रु.२०००० + इतर भत्त्यासाठी रु.५००० |
| ३ | वनक्षेत्र सर्वेक्षक | १ | रु.५२००-२०२०० + ग्रेड पे रु.२४०० | रु.१५००० + इतर भत्त्यासाठी रु.५००० |
| ४ | सर्वेक्षक | २ | रु.५२००-२०२०० + ग्रेड पे रु.२४०० | रु. १२००० + इतर भत्त्यासाठी रु. २००० |
| ५ | वनरक्षक | १२ | रु.५२००-२०२०० + ग्रेड पे रु.१८०० | रु.१२००० + इतर भत्त्यासाठी रु.२००० |
| ६ | लघुलेखक (कनिष्ठ श्रेणी) | १ | रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु. ४३०० | रु. १५०००+ इतर भत्त्यासाठी रु. ३००० |
| ७ | मुख्य लेखापाल | १ | रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु. ४३०० | रु. १५०००+ इतर भत्त्यासाठी रु. ३००० |
| ८ | लेखापाल | ४ | रु. ५२००-२०२००+ ग्रेड पे रु. २८०० | रु.१२००० + इतर भत्त्यासाठी रु.१५०० |
| ९ | लिपिक | ५ | रु. ५२००-२०२००+ ग्रेड पे रु. १९०० | रु.१२००० + इतर भत्त्यासाठी रु.२००० |
| १० | नौकाचालक | २ | रु. ५२००-२०२००+ ग्रेड पे रु. १९०० | रु.१२००० + इतर भत्त्यासाठी रु.२००० |
| ११ | डिंघी चालक | २ | रु. ५२००-२०२००+ ग्रेड पे रु. १९०० | रु.१२००० + इतर भत्त्यासाठी रु.२००० |
| १२ | खलाशी | २ | रु. ४४४०-७४४०+ ग्रेड पे रु. १३०० | रु.१०००० + इतर भत्त्यासाठी रु.१५०० |
| | एकूण | ३७ | | |

४. वरील पदे भरण्याची कार्यवाही शासनाच्या प्रचलित धोरणानुसार खालीलप्रमाणे करण्यात यावी :-

* उपरोक्त पदांपैकी वनरक्षक, नौकाचालक, डिंगी चालक व खलाशांची पदे माजी नौसैनिकांद्वारे भरली जातील या दृष्टीने कार्यवाही व्हावी.
* उपरोक्त तक्त्यातील क्रमांक १ व २ येथील पदे राजपत्रित दर्जाची असल्याने त्यांची नियुक्ती विहित कार्यपध्दती अनुसरुन करावी. तोपर्यंत सदरची पदे त्याकरीता आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्यामधून भरण्याकरीता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य व विभागीय समाज कल्याण अधिकारी यांच्या त्रिस्तरीय समितीला परवानगी देण्यात येत आहे.
* उपरोक्त तक्त्यातील क्रमांक ४, ५, ६, ८, ९, १०, ११ व १२ येथील पदांवर नियुक्ती करण्यासाठी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर तसेच क्रमांक ३, व ७ येथील पदांवर नियुक्ती करण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना परवानगी देण्यात येत आहे.

४. या पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २४०६- वनीकरण व वन्यजीवन (२४०६ ७२२३), १०१ (११) वनसंधारण व विकास, (११) (३२) १३ केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वनांचे व्यवस्थापन याकरिता केंद्र सहाय्य (दत्तमत) (२४०६-७२२३) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०११-२०१२ या वर्षासाठी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय दिनांक ०३.०९.२०११ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११११०११६३६११००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( विजय सूर्यवंशी )
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.
विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
पोलीस आयुक्त, मुंबई.
उप सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.
आयुक्त, ठाणे महानगर पालिका, ठाणे.
आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगर पालिका, कल्याण.
आयुक्त, नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई.
आयुक्त, मिरा-भाईंदर महानगर पालिका, भाईंदर.
आयुक्त, भिवंडी महानगर पालिका, भिवंडी.
आयुक्त, उल्हासनगर महानगर पालिका, उल्हासनगर.
व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई.
जिल्हाधिकारी, मुंबई / मुंबई उपनगर / ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदूर्ग.
पोलीस अधिक्षक, ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदूर्ग.
सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) / सर्व वनसंरक्षक (प्रादेशिक)/ सर्व संबंधित उपवनसंरक्षक.
सर्व कक्ष अधिकारी, वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
कक्ष अधिकारी (व्यय-१०) / (विसु-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
फ-१/फ-४ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ (निवडनस्ती).

-------